मटा सोशल कनेक्ट

शिक्षण

Appasaheb.mali
@timesgroup.com
Tweet : Appasaheb_MT

# जूनपासून 'कमवा व शिका' योजना

- विद्यार्थी भवनची सुवर्णमहोत्सवी कामगिरी
- पाच हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचे करिअर

**कोल्हापूर :** शिकायची इच्छा आहे, पण घरची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. शहरी भागात शैक्षणिक खर्च परवडत नाही, यामुळे पदव्युत्तर शिक्षण थांबण्याच्या टप्प्यावर असणाऱ्या विद्यार्थ्यांना शिवाजी विद्यापीठाने 'कमवा व शिका' असा मंत्र दिला. या योजनेच्या बळावर गेल्या पाच दशकांत तब्बल पाच हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी विद्यार्थी भवनमध्ये राहून करिअर घडविले. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या 'कमवा व शिका योजने'चे (विद्यार्थी भवन) यंदाचे वर्षे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. यानिमित्ताने विद्यापीठ प्रशासनाने, येत्या जूनपासून प्रत्येक कॉलेजमध्ये 'कमवा व शिका योजना'सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

कोल्हापूर, सांगली, सातारा या तीनही जिल्ह्यांतील कॉलेजना या योजनेच्या अंमलबजावणीविषयी कळविले आहे. मे महिन्यात विशेष कार्यशाळा होणार आहे. विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांचा ३८ वा स्मृतिदिन आज (३० डिसेंबर) आहे. 'डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनी आणि विद्यापीठातील विद्यार्थी भवन यांच्या संयुक्त विद्यमाने 'कमवा व शिका योजने'च्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा उद्घाटन समारंभ आयोजित केला आहे.

'१५ जून १९६९ रोजी विद्यार्थी भवनची सुरुवात झाली. पहिल्या वर्षी २५ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. रोज तीन तास शेतातील कामे करायची आणि त्या मोबदल्यात भवनमध्ये निवासाची सोय आणि विद्यापीठात शिकण्याची सुविधा हे त्याचे सूत्र होते. विद्यापीठात भात, ऊस, भुईमूग या पिकांचे उत्पादन होई. शेतीची बहुतांश कामे विद्यार्थी करत. सध्याचा जो गेस्ट हाउस आहे, त्या ठिकाणी ऊसशेती होती. संगीत व नाट्यशास्त्र विभाग आणि तलाव परिसरात भातशेती होती,' अशा शब्दांत योजनेच्या पहिल्या बॅचचे विद्यार्थी व विद्यापीठातील भूगोल विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. सी. टी. पवार यांनी आठवणी उलगडल्या. १९९४ मध्ये मुलींसाठी 'कमवा व शिका' योजना सुरू झाली. प्रशासनाने कालानुरूप भवनच्या विद्यार्थ्यांच्या कामातही बदल केला आहे.

## भवनच्या विद्यार्थ्यांची झेप

विद्यार्थी भवनच्या विद्यार्थ्यांनी सर्व क्षेत्रांत नाव कमविले आहे. माजी कामगार आयुक्त अंकुश मोरे, प्राचार्य व्ही. एस. लिपारे, प्राचार्य एस.जी. खामकर, प्राचार्य जी. एम. जर, डॉ. सी. टी. पवार, डॉ. ए. डी. मुळीक हे सगळे पहिल्या बॅचचे, तर उच्च शिक्षण संचालक ते नागपूर विद्यापीठाचे कुलगुरूपद भूषविलेले डॉ. एस. एन. पठाण हे भवनचे दुसऱ्या बॅचचे विद्यार्थी म्हणून ओळख आहे. सेवानिवृत्त विभागीय आयुक्त कल्याण गवळी, पोलिस अधीक्षक चंद्रकांत कुंभार, प्राचार्य बी. एल. पाटील, प्राचार्य भैरव कुंभार, प्राचार्य अर्जुन राजगे, प्राचार्य एस. जे. नाईक, प्राचार्य जी. पी. माळी, प्राचार्य अर्जुन पाटील, प्राचार्य एल. बी. पाटील, प्राचार्य जे. बी. चौगुले, प्राचार्य एस. बी. गायकवाड, प्रो. सी. एच. भोसले, डॉ. अलका पाटील, डॉ. संभाजी शिंदे, शिक्षण सहसंचालक पांडुरंग केचे अशी 'भवन'च्या माजी विद्यार्थ्यांची यादी मोठी आहे. भवनचे पहिले अधीक्षक म्हणून प्रा. चंद्रकुमार नलगे यांनी काम केले आहे.

## आजी, माजी विद्यार्थ्यांची प्रबोधिनी

डॉ. अप्पासाहेब पवार यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन व ज्या संस्थेमुळे आपले करिअर घडले, त्या संस्थेच्या कृतज्ञतेपोटी भवनमधील आजी-माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन २००६ मध्ये 'डॉ. अप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनी'ची स्थापना केली. प्रबोधिनीमार्फत परदेशी शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्थसाह्य केले जाते. आप्पासाहेब पवारांच्या जयंती व स्मृतिदिनाला वेगवेगळ्या उपक्रमांचे आयोजन केले जाते. गरजू विद्यार्थ्यांना मदत, संशोधनासाठी सहकार्य, प्रबोधनपर व्याख्याने होतात. विद्यापीठ व प्रबोधिनी एकत्र येऊन दरवर्षी एका विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती देण्याचे नियोजन सुरू आहे असे प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष डॉ. एस. जे. नाईक यांनी सांगितले. विद्यापीठाचे कुलगुरू हे प्रबोधिनीचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. उपाध्यक्षपदी प्रा. टी. के. सरगर, खजिनदारपदी अशोक साबळे आहेत.



**विद्यार्थी भवनची ५० वर्षांची वाटचाल विद्यापीठासाठी भूषणावह आहे. पदव्युत्तर स्तरावर कमवा व शिका योजना सुरू करणारे शिवाजी विद्यापीठ हे पहिले विद्यापीठ म्हणून नावलौकिक आहे. विविध शैक्षणिक उपक्रमांनी सुवर्ण महोत्सवी वर्षाला आणखी झळाळी मिळणार आहे.**

- **डॉ. डी. टी. शिर्के**, प्रकुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

# श्रम प्रतिष्ठेतून घडले लाखो विद्यार्थी!

## ‘कमवा व शिका’ योजनेचा सुवर्ण महोत्सव; अनेकजण उच्च पदांवर कार्यरत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोणी शेती.. कोणी पिठाची गिरणी.. तर कोणी दूध वितरण, वीटभट्टीवर काम करून शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन कमवा व शिका योजनेच्या माध्यमातून जीवनात यशस्वी झाले. ५० वर्षांच्या काळात श्रम प्रतिष्ठेतून ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थी भवनच्या माध्यमातून घडले आहेत.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणारे विद्यार्थी शिक्षणापासून दूर राहू नये, हे उद्दिष्ट ठेवून शिवाजी विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांनी १९६८ मध्ये ‘विद्यार्थी भवन कमवा व शिका’ योजनेची सुरुवात केली. त्यानंतर डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन-कमवा व शिका योजना असे भवनचे नामकरण झाले. यंदाचे वर्ष योजनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. योजनेत शिकणारे विद्यार्थी व विद्यार्थिनी ग्रामीण भागातील आहेत. ५० वर्षांत कोल्हापूर,



सांगली, सातारा, सोलापूर व दुसऱ्या राज्यांतील लाखो विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले आहे. भवनमध्ये शिकलेले विद्यार्थी प्राध्यापकापासून कुलगुरू पदांपर्यंत पोहोचले आहेत. पोलिस दल व प्रशासनातील उच्च पदांवर विराजमान आहेत.

शिक्षण घेताना अधिविभागाची वेळ सांभाळून हे विद्यार्थी दिवसाचे तीन तास काम करतात. कामाच्या मोबदल्यात त्यांना मोफत राहणे, खाणे व परीक्षा फी दिली जाते. योजनेच्या सुरुवातीच्या काळात शेतीची कामे, पिठाची गिरणी, दूध वितरण, वीटभट्टीवर काम त्याऐवजी आता झेरॉक्स सेंटर, उद्यान, ग्रंथालय, जिम,

> ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल परंतु गुणवंत विद्यार्थ्यांना आत्मनिर्भर व स्वतःच्या पायावर उभे राहण्यास डॉ. आप्पासाहेब पवार भवनने मदत केली आहे. श्रमप्रतिष्ठा व ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणासाठी विद्यार्थी भवन महत्त्वाची भूमिका बजावत आहे. भवनच्या माध्यमातून विद्यार्थी अनेक जीवनावश्यक कौशल्य आत्मसात करून यशस्वी वाटचाल करीत आहेत.
>
> **- प्रा. डॉ. संभाजी शिंदे,**
> रेक्टर, डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन

हॉस्टेल मेससह इतर कार्यालये, परीक्षा विभागात भवनचे विद्यार्थी काम करताना दिसत आहेत.

कमवा आणि शिका योजनेत शिकणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या लक्षणीय आहे. योजनेतील मुलींच्या राहण्याची सोय ही विद्यार्थिनी वसतिगृहात होती. सध्या योजनेतील मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची सोय करण्यात आली आहे. मुलांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. कमवा व शिका विद्यार्थी भवनच्या इमारती बद्दल विशेष म्हणजे ही इमारत भवनच्या मुलांनीच डिझाईन करून स्वतः बांधकाम केलेली आहे.

> शिवाजी विद्यापीठातील डॉ. आप्पासाहेब पवार कमवा आणि शिका योजना पदव्युत्तरसाठी देशातील पहिली योजना आहे. योजनेच्या माध्यमातून गरिबांच्या विद्यार्थ्यांना खडतर प्रवास करून शिक्षण घेता येत आहे. आज हजारो विद्यार्थी मोठ्या पदावर आहेत. कष्टातून शिकून मोठ्या पदावर जाता आले ही भावना मोठी आहे.
>
> **- प्रा. डॉ. सी. टी. पवार,**
> पहिल्या बॅचचे विद्यार्थी

# डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवनचा आज सुवर्ण महोत्सव समारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ डॉ. आप्पासाहेब पवार कमवा व शिका प्रबोधिनी आणि डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांचा स्मृतिदिन व विद्यार्थी भवन सुवर्ण महोत्सव उद्‌घाटन समारंभ सोमवार (दि.३०) होणार आहे.

सुवर्णमहोत्सवी वर्षाचे उद्‌घाटन सकाळी ११ वाजता कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के असणार आहेत. यावेळी प्रा. किसनराव कुराडे यांचे व्याख्यान होणार आहे.

# पर्यावरण संवर्धनाचा वर्षभर होणार जागर

## निरोगी पर्यावरण व संवर्धन मिशन-२०२०; जगभरात जागृती व कृती कार्यक्रम

**बी.डी.चेचर :** सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : माणूस आणि एकूणच सारी जैवविविधता सुरक्षित राहण्यासाठी वनस्पतींचे आरोग्य जपले पाहिजे. या पार्श्वभूमीवर २०२० हे वर्ष संयुक्त राष्ट्रसंघाने आंतरराष्ट्रीय जैवविविधतेच्या दशकानुसार, शाश्वत विकासाची गुरुकिल्ली म्हणून निरोगी पर्यावरण आणि झाडांच्या आरोग्याचे संवर्धन वर्ष म्हणून जाहीर केले आहे. भूक, दारिद्र्य आणि पर्यावरणाला



होणाऱ्या धोक्यांसह जागतिक समस्या सोडविण्यात वनस्पतींचे आरोग्य महत्त्व जाणून घेण्याकडे यानिमित्ताने जगाचे लक्ष वेधले जाणार आहे.

वनस्पतींवर विविध रोग, विषाणू, कीटकांचा हल्ला होत असतो. त्यामुळे झाडांची फलधारणा मंदावते. किंबहुना वाढ कमी होते. कधी कधी उभी झाडे वाळून जाण्याचे प्रमाण आढळून आले आहे. मानवनिर्मित नदी प्रदूषण, पाणी प्रदूषण, रासायनिक खते यामुळे वनस्पतींच्या आरोग्यावर परिणाम होतो. त्यामुळे साऱ्या वनस्पती आता डेंजर झोनमध्ये आहेत.

अन्न व कृषी संघटना (एफएओ) या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अंदाजानुसार कृषी उत्पादनांच्या व्यापारातील ४० टक्के जागतिक अन्न पिके वर्षाला कीटकांमुळे गमावली जातात. जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात सुसंवाद साधून फायटोसॅनेटरी मानकांची अंमलबजावणी होईल. कीटकांमुळे होणारा तोटा कमी करून, आंतरराष्ट्रीय व्यापार सुलभ करण्यासाठी मदत होईल. विशेषत: विकसनशील देशांसाठी आणि अन्न सुरक्षिततेस उपयुक्त ठरेल.

> **वाढती हरितगृहे, कार्बन, मिथेन, नायट्रोजनडाय ऑक्साईड या वायूंचे प्रमाण वाढल्याने जागतिक तापमानात वाढ होत आहे. वातावरणात बदल होऊन अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, वादळे आदी घटना घडत आहेत. त्यामुळे झाडे लावणे-जगवणे आणि ती निकोप राहतील, यासाठी प्रयत्न करावे लागतील. या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रसंघाने २०२० हे वर्ष निरोगी पर्यावरण व वनस्पती संवर्धन वर्ष म्हणून घोषित केले आहे.**
>
> **- डॉ. पी. डी. राऊत,** शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख.

**पान २ वर »**

# पर्यावरण संवर्धनाचा वर्षभर होणार जागर

» पान १ वरून

इंटरनॅशनल प्लांट प्रोटेक्शन कन्व्हेन्शन (आयपीपीसी) ही संयुक्त राष्ट्र संघटना आहे, जी वनस्पती आणि वनस्पती उत्पादनांच्या आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी फिटो (वनस्पती) स्वच्छताविषयक मानदंड ठरवते. त्याच पार्श्वभूमीवर २०२० हे वर्ष निरोगी व पर्यावरणाचे संवर्धन करणे घोषित केले असल्याने राज्यातही त्याच धर्तीवर आता जनजागृती सुरु झाली आहे.

❝ वृक्षे असतील तरच ही सृष्टी जगेल. त्यांच्यावर आधारित आपले जीवन आहे. त्यामुळे वेळीच त्यांचे महत्त्व ओळखून झाडे, वृक्ष, वेली, वनस्पतींचे संवर्धन व संरक्षण केले पाहिजे.

**- डॉ. एस. आर. यादव,** वरिष्ठ शास्त्रज्ञ, इंडियन नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्स.

❝ कीटक व आजार पासपोर्ट बाळगत नाहीत किंवा कायमचे वास्तव्य करण्यासाठी परदेशातून येण्यासाठी त्यांना परवानगी लागत नाही. अशा जीवांचा प्रसार रोखणे हा आंतरराष्ट्रीय उपक्रम आहे. ज्यासाठी सर्वांच्या योगदानाची व सहकार्याची आवश्यकता आहे.

**- उदय गायकवाड,** पर्यावरण अभ्यासक

# अखिल भारतीय स्पर्धेसाठी विद्यापीठ संघ रवाना

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठाचा पुरुष फुटबॉल संघ जालंधर ( पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी रवाना झाला. जालंधर येथील संत बाबा भागसिंग विद्यापीठात स्पर्धा३१ डिसेंबर ते ५ जानेवारीदरम्यान होणार आहे. स्पर्धेत पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर विभागातील प्रत्येकी चार असे एकुण सोळा संघ सहभागी होणार असून, शिवाजी विद्यापीठाचा संघ पश्चिम विभागाचे प्रतिनिधित्व करणार आहे. संघामध्ये राहुल पाटील (कर्णधार), मयुरेश चौगले व ओंकार सुतार (गोलरक्षक), आरबाज पेंढारी, पवन माळी, संकेत साळोखे, ओंकार लायकर, ऋतुराज संकपाळ, अक्षय पायमल, प्रथमेश कांबळे, प्रतिक बदामे, प्रथमेश हेरेकर, प्रभू पोवार, रोहित पोवार, दिग्विजय सुतार, सुयश हांडे, सौरभ आढाव, निखिल बचाटे, संतोष कांबळे, चेतन डोंगरे या खेळाडूंचा समावेश आहे. संघासोबत प्रशिक्षक प्रा. डॉ. अभिजित वणिरे व व्यवस्थापक प्रा. डॉ. शिवराज गायकवाड आहेत.



**कोल्हापूर : अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी सहभागी शिवाजी विद्यापीठाचा संघ.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 DEC 2019
Times of India

# SUK signed 156 MoUs in last 5 years

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur**: Shivaji University, Kolhapur (SUK) has signed as many as 156 memorandum of understandings (MoUs) with local, national and international institutes in the past five years.

The information was revealed in the senate meeting held at the varsity earlier this month.

D T Shirke, pro-VC, SUK, said that there was a variety in the MoUs signed. "We are associated with the local institutes for example the leather cluster associations in the city as well as the ones like the South Korean, German and other international universities."

Ever since the Maharashtra Public Universities Act, 2016, was enacted, it was made mandatory for all universities to take prior permission of the state government before signing an MoU with any foreign institute, Shirke said. "We have at least three such proposals right now with the state government that are pending approval," he said.

According to Shirke, the MoUs with national and international universities have opened opportunities in the field of scientific research for research students of various departments. He said that the international universities are equipped with the latest scientific instruments and availability of funds poses a great advantage for SUK's research scholars.